पुणे, दिनांक :- ०३/०९/२०१९

**प्रेस नोट**

दिनांक ०२/०९/२०१९ रोजी गणशोत्सवाचे अनुषगांने गुन्हे शाखेने पुणे शहरातील महत्वाचे निरनिराळया झोपडपट्टयांमध्ये सांयकाळी १६.०० ते रात्रौ २०.०० वा. चे दरम्यान कोबिंग ऑपरेशन करुन खालील प्रमाणे कारवाई केलेली आहे.

युनिट-०१ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी कासेवाडी, कामगार पुतळा, राजीव गांधी झोपडपट्टी मध्ये कोबिंग ऑपरेशन करुन एकुण ४८ रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक केले आहेत. त्यापैकी २८ गुन्हेगार मिळून आले आहेत. एकुण ०५-भंगार मालाची दुकाने चेक केली. तसेच एकुण १९ हॉटेल व लॉजेस चेक केली आहेत. आक्षेपार्ह व संशयास्पद असे मिळुन आले नाही.

युनिट-०२ कडील अधिकारी व कर्मचारी यांनी डायस प्लॉट, औद्योगिक वसाहत, महर्षिनगर झोपडपट्टी या भागात कोबिंग ऑपरेशन करुन रेकॉर्डवरील १८ गुन्हेगार चेक केले आहेत. त्यापैकी ०३-गुन्हेगार मिळून आले आहेत. तसेच एमपीडीए कायदयांन्वये पुर्वी कारवाई केलेले ०५-गुन्हेगार चेक केले आहेत. सदर गुन्हेगार मिळुन आले आहेत.

युनिट-०३ पथकाने जनता वसाहत, तुकाईनगर या झोपडपट्टयांमध्ये कोबिं ऑपरेशन करुन रेकार्डवरील २१ गुन्हेगार चेक केले आहेत. त्यापैकी ११-गुन्हेगार मिळून आले आहेत.

युनिट-०४ कडील पथकाने लक्ष्मीनगर,येरवडा झोपडपट्टीमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन रेकॉर्डवरील २१ गुन्हेगार चेक केले आहेत. त्यापैकी १६ गुन्हेगार मिळून आले आहेत.

युनिट-०५ कडील पथकाने म्हाडा कॉलनी, रामनगर, आनंदनगर, सुरक्षानगर, बिराजदार नगर, इंदिरानगर, वेताळबाबा झोपडपट्टयांमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन रेकॉर्डवरील २० गुन्हेगार चेक केले. त्यापैकी ०८ गुन्हेगार मिळून आले आहेत. तसेच हडपसर पो.स्टे. चे हद्दीत एक इसम कोयता घेवून फिरत असल्याची माहिती मिळाल्याने त्यास पकडुन त्याचे ताब्यातुन एक कोयता जप्त करण्यात आला असून हडपसर पो.स्टे. येथे *आर्म* **ॲक्ट कलम ४/२५,** म.पो.ॲ.कलम ३७(१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथक, पश्चिम यांनी बंडगार्डन पो.स्टे. चे हद्दीत ताडीवाला रोड झोपडपट्टीमध्ये कोबिंग ऑपरेशन करुन रेकॉर्डवरील १६ गुन्हेगार चेक केले त्यापैकी ०४ गुन्हेगार मिळुन आले आहेत. चंदननगर पो.स्टे. चे हद्दीत एक इसमाचे कब्जात एक कोयता मिळून आलेने त्याचे विरुध्द चंदननगर पो.स्टे. गुरनं.३३६/१९ **आर्म ॲक्ट कलम ४/२५** प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

अंमली पदार्थ विरोधी पथक, पुर्व यांनी एनडीपीएस ॲक्टनुसार पुर्वी कारवाई केलेले २० गुन्हेगार चेक केले असून त्यापैकी १५ गुन्हेगार मिळुन आले आहेत. तसेच पुर्वी मोका कायदयान्वये कारवाई केलेल्या ११ गुन्हेगारांना चेक केले असून त्यापैकी ०१-गुन्हेगार मिळुन आला आहे.

सामाजिक सुरक्षा पथकाने एकुण १९ लॉजेस चेक केले असून त्यापैकी निधी लॉज, हडपसर, अश्विनी लॉज, कात्रज, न्यु रॉयल लॉज, कोंढवा, हॉटेल राज पॅलेस कोंढवा, हॉटेल गारवा, कोंढवा यांचेवर रजिस्टर अदयावत न ठेवल्याने भादंविक १८८ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे श्री. अशोक मोराळे यांचे आदेशान्वये, श्री. बच्चन सिंह,पोलीस उपआयुक्त, गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेकडील पो.नि. श्री. वायकर, श्री. गजाजन पवार, श्री. राजेंद्र मोकाशी, श्री. अंजुमन बागवान, श्री. दत्ता चव्हाण, श्री. राजेंद्र मोहिते, श्री. तिकोळे, श्रीमती वैशाली चांदगुडे व त्यांचे पथकातील कर्मचा-यांनी केलेली आहे. सदर कारवाई यापुढेही चालु राहणार आहे.